मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत



# यहोशावा पदभार स्विकारतो

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
रूपान्तरकार: Ruth Klassen
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मोशे मरण पावला होता. आता इस्राएलांचे नेतृत्व करण्यासाठी परमेश्वराने यहोशवाला निवडीले आहे हे यहोशवा जाणून होता. सैन्याची तयारी करण्याआधि यहोशवाला स्वतःची तयारी करण्याची गरज होती. लोकांनी जर सदैव देवाच्या वचनाचे पालन केले तर अभिवचनाच्या देशात यहोशवाला देवाने विजय व संपन्नेतेचे अभिवचन दिले होते.





इस्त्राएलांनी वचन
दिले होते की ते सदैव
यहोशवाचे ऐकतील
व देवाच्या वचनाचे
पालन करतील. नवीन
पुढाऱ्याने, हुशारीने
महान यरिहो शहराचा
भेद काढण्यासाठी हेर
पाठविले. येथे
इस्त्रालांचे पहिले
युध्द् होणार होते.



यरिहोच्या राजाला कोणीतरी बातमी दिली की शहराचा भेद काढण्यासाठी शहरात हेर आले आहेत. त्यांचा शोध लावण्यासाठी त्याने त्याचे सैनिक पाठविले. जेथे ते हेर थांबले होते त्या राहाबच्या घरातून शोध मोहिमेला सुरवात झाली. सैनिकांनी जोरात दारावर थाप मारली. राहाबने ताबडतोब त्या हेरांना नेऊन जेथे जवसाची ताटें पसरली होती त्यात लपवून ठेवले.

राहाबने किरमिजी दोर बांधुन
त्या शहराच्या कोटावरुन हेरांना
सुरक्षित खाली उतरवविले, आणि
ते हेर तेथून निघून गेले. तिने
हेरांना का मदत केली? कारण
देव त्यांच्याबरोबर आहे हे तिला
माहित होते. देवाने तिचे जीवन
वाचवावे अशी तिची अपेक्षा होती.
राहाब आणि तिच्या कुटुंबाचा
बचाव करण्याचे अभिवचन
त्या हेरांनी दिले.



यरिहो शहरापर्यंत पोचण्याच्या आधि, इस्त्राएल लोकांना अभिचनदत्त प्रदेश कनान; येथील यार्देन नदी पार करावी लागणार होती. परंतु तेथे तर पुल देखिल नव्हता ! तर मग लोक नदी पार कशी करतील?



परमेश्वर देवाने यहोशवाला सांगितले की, ज्या कराराच्या कोशात दहा आज्ञा आहेत तो कराराचा कोश याजकांनी उचलून घ्यावा आणि सैनिक व सर्व लोकांच्या पुढे चालून त्यांचे नेत्तृत्व करावे. याजकांचे पाय जेंव्हा नदीच्या कडेच्या पाण्यात बुडाले, तेंव्हा चमत्कार घडला. देवाने पाण्यात कोरडी वाट तयार केली.



सर्व लोक सुरक्षितपणे नदीच्या पलिकडे गेल्यावर, त्यांनी नदी पात्रात बारा धोंडे उभे केले आणि बारा धोंडे कनानाच्या भागात नदीच्या किनाऱ्यावर उभे केले. देवाचे महान सामर्थ्य व प्रीति यांविषयी लोकांनी त्यांच्या लेकरांना शिकवावे यासाठी हे धोंडे आठवण करुन देण्यास मदत असे ठरतील.





यरिहोचा कोट फार मोठा
आणि मजबूत होता. हल्ला
कसा करावा ते यहोशवाने
ठरवले, तेंव्हा देव त्याच्या
लोकांसाठी युध्दे जिंकतो
याची आठवण इस्त्राएलांच्या
नविन पुढाऱ्याला करुन
देण्यासाठी देवाने स्वर्गातून
त्याच्या सैन्याच्या
सेनापतीला पाठविले.



यरिहोवर कसा हल्ला करावा हे देवाने यहोशवाला सांगितले. ती फारच विचित्र योजना होती. सहा दिवस पर्यंत रोज एक वेळा देवाच्या लोकांनी त्या शहराला गोल फेरि मारायची होती, आणि सातव्या दिवशी सात फेऱ्या. आणि मग त्यांच्या जवळील रणशिंगांचा आवाज करायचा व जोराने ओरडायचे होते, म्हणजे शहराचा कोट खाली कोसळणार होता !

देवाने आज्ञा केल्याप्रमाणे यहोशवा आणि त्याच्या सैन्याने केले. कदाचित यरिहो शहरातील लोक त्यांच्यावर हसले असावेत. परंतू सातव्या दिवशी सातव्या फेरि नंतर याजकांनी मेढ्यांच्या शिंगानी बनविलेले रणशिंगें फुंकिली. आणि परमेश्वर देवाने अभिवचन दिल्याप्रमाणे... यरिहोची महान भित कोसळून पडली.









कोटावरिल केवळ राहाबचे घर सुरक्षित होते.
तिने किरमिजी दोर खिडकीत बांधून ठेवला
होता. येहोशवाच्या लोकांनी ताबडतोब जाऊन
तिला व तिच्या कुटुंबाला तेथून सोडवले.
त्यानंतर देवाने आज्ञापिल्याप्रमाणे
यरिहो उध्वस्त करण्यात आले.



यहोशवाने यरिहोत मिळालेले, सोने,
चांदी, आणि संपत्ती सर्वकाही देवाच्या
सेवेसाठी विधिवत देवाला समर्पित केले.
आणि मग जो कोणी या दुष्ट शहराची पुनर्उभारणी करील
त्याला यहोशवाने शापित केले. यहोशवाने यरिहोचा पराभव
कसा केला याविषयी कनानात लवकरच सर्वांना कळले.
देव त्याच्या लोकांबरोबर आहे हे त्यांना माहित होते.

यहोशवा पदभार स्विकारतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

यहोशवा १-६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला!   योहान 3:16